# नागरिकत्वाचे शिक्षण

आपला देश हा एक लोकशाही देश आहे. म्हणजे आपल्या देशाला कुणी एक राजा नाही. राजा म्हणजे जो इतरांचे रक्षण करतो तो. लोकशाहीत असा एक राजा नसतो. तर आपल्यापैकी प्रत्येकजण राजा असतो. प्रत्येक नागरीक हा त्याच्या त्याच्यापुरता राजा असतो. त्यानेच त्याचे स्वतःचे रक्षण करायचे असते; त्यानेच आपल्या स्वतःची जबाबदारी घ्यायची असते.

अशी स्वतःची जबाबदारी घेण्याचे स्वातंत्र्य, लोकशाहीत प्रत्येक स्त्री-पुरूषाला मिळालेले असते. स्वातंत्र्य म्हणजे स्वतःच्या मनाने, स्वतःचे स्वतःच ठरवून स्वतःचा विकास करण्याची मोकळीक. अशी मोकळीक , आपल्या देशात, प्रत्येकाला आहे. आपल्या देशाच्या राज्यघटनेने प्रत्येक नागरीकास स्वतःच्या विकासाचे स्वातंत्र्य ठेवले आहे. या स्वातंत्र्याचा असाही एक अर्थ होतो की आपल्यावर कोणीही बळजबरी करणार नाही; कशाचीही सक्ती करणार नाही. अशी सक्ती-बळजबरी कोणी करू पाहील तर ती नाकारण्याचेही स्वातंत्र्य आपल्याला आहे. त्यासाठी या देशातील न्यायालये आपल्याला मदत करतात.

आपल्याला जी स्वतःचा विकास करण्याची मोकळीक आहे, जे स्वातंत्र्य आहे त्याचा उपयोग करून आपण आपला सर्वतोपरी विकास साधू शकतो. आपण छान जगू शकतो. चांगले आयुष्य घालविण्यासाठी प्रत्येक मनुष्यालाच, निसर्गाने, कितीतरी क्षमता दिल्या आहेत. प्रत्येक मुला-मुलीने आपल्यात कोणत्या क्षमता आहेत हे शोधले पाहिजे. निसर्गाने आणखीही एक गंमतीदार गोष्ट करून ठेवली आहे. त्याने वेगवेगळया व्यक्तींना वेगवेगळया क्षमता बहाल केल्या आहेत. कुणाला चांगले गाता येईल अशी तजवीज करून ठेवली आहे. तर कुणाला चित्रकार बनण्याची क्षमता देऊन ठेवली आहे. कुणी चांगला गणिती-शास्त्रज्ञ होऊ शकतो तर कुणी उत्तम खेळाडू होऊ शकतो. कुणी छान कविता-गोष्टी लिहिणारा कवी-लेखक म्हणजे साहित्यिक होऊ शकतो तर कुणी चांगला ड्रायव्हर, इंजिनिअर, वास्तुशास्त्रज्ञ होऊ शकतो. मुख्य असे की तुम्हाला काहीही होण्याची मुभा लोकशाहीत असते. आपल्याला कोणताही व्यवसाय करून उत्तम त-हेने जगण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला, प्रत्येकीला असते. आणखी एक गोष्ट निसर्गाने करून ठेवली आहे. प्रत्येक माणसामध्ये कोणती ना कोणती क्षमता ठेवलीच आहे. त्यामुळे आपल्या मित्राकडे, शेजाऱ्याकडे असलेली एखादी क्षमता आपल्याकडे नसेल, पण त्याचबरोबर त्याच्याकडे नसलेली अशी एखादी क्षमता आपल्यात बसलेली असेल. त्यामुळे कोण काय करतो यापेक्षा आपण काय करू शकतो यालाच आपण नेहमी महत्त्व द्यायचे आहे.

आपण काय करू शकतो, काय काय करण्याची क्षमता निसर्गानेच आपल्याला प्राप्त झाली आहे याचा शोध मात्र आपला आपण घेतला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक युवक-युवतीने आधी स्वतःकडे पाहायला शिकले पाहिजे. बऱ्याचदा आपण दुसरे काय करतात, काय करू शकतात याकडेच लक्ष देतो; आणि तसेच आपणही करावे असे ठरवतो; पण हे करताना नेमकी तीच क्षमता आपल्यात आहे काय, हेच आपण शोधून पाहत नाही. आणि मग काही वेळा अपयशाचे धनी आपल्याला व्हावे लागते.

आपण आपल्यातल्या क्षमता ओळखायला सुरूवात केली पाहिजे. त्यासाठी शाळेच्या वयांतच खूप काही गोष्टी करून पाहायच्या. त्यातल्या ज्या आपल्याला नीट जमत नाहीत त्या सरळ सोडून द्यायच्या; कारण, त्या

आपल्या नाहीत. मात्र ज्या गोष्टी जमतात त्यांवर भर द्यायचा. त्या सतत करायच्या. त्यातून आपले कौशल्य वाढेल. आपल्याला असे काही छान करता येते याचा आनंद होईल, अभिमान वाटेल. आणि आपल्याला आपल्याविषयी प्रेम वाटू लागेल. मग पुढे, याच विषयात आपण व्यवसाय करू शकू. जगात खूप व्यवसाय असतात. आज आपण भारतातले व्यवसाय मोजू लागलो तर सहज लाखाच्यावर व्यवसाय निघतील. त्यात आपल्यासाठी कोणता ना कोणता व्यवसाय असतोच. आपण त्याचाही नियमीतपणे शोध घेत राहिले पाहिजे. उगीच दुसरे करतात ते करायला धावायचे काहीच कारण नाही. आपण, आपल्याला स्वतःला काय करायचे आहे ते करायची मोकळीक आपल्याला आहे; ते स्वातंत्र्य आपल्याला आहे. आपल्याला जे चांगले जमते त्याचेच रूपांतर व्यवसायात करतो तोच नेहमी यशस्वी व्यावसायिक ठरतो. आपण आपल्या स्वतःतील क्षमता जोखून त्याचाच व्यावसायिक उपयोग करायला हवा; कारण, तोच आपला निसर्गदत्त व्यवसाय असतो.

एकदा का आपले उपजत क्षमतेचे क्षेत्र आपल्याला सापडले की आपण सहजपणेच त्यात काम करू लागतो; काम करण्याचा आनंद आपल्याला होतो. निसर्गाने याचीही आपल्यात तयारी करून ठेवली आहे. आपल्याला श्रमशक्ती असते. श्रम करण्याची शक्ती ही माणसाला आनंद देणारी शक्ती असते. आपण या आनंदाला 'श्रमानंद' असे म्हणू शकतो. ज्याला श्रम करण्याम आनंद वाटतो तोच जीवनात यशस्वीपणे खूप पुढे जातो. जो आळसात आनंद घेतो तो यशाच्या कळसापर्यंत कधीच पोचू शकत नाही!

आपण आपल्या स्वतःचा शोध घेणे, स्वतःचे कार्यक्षेत्र ठरवणे, त्यासाठी श्रम करणे, या श्रमात आनंद घेणे या गोष्टी साध्य करण्यासाठी, निसर्गाने आणखी एक शक्ती आपल्याला दिली आहे. ती आहे विचारशक्ती. आपण छान विचार करू शकतो ही एक महान शक्ती आहे. तिचा सतत वापर करायला शिकले पाहिजे. ती दुसऱ्यांच्या उपदेशांने, बळजबरीने, सक्तीने आपण कधीही दुषित होऊ देता कामा नये. विचार करण्याचे स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य होय! पूर्वीच्या काळच्या गुलामांना हे विचार करण्याचे स्वातंत्र्यच नसायचे म्हणून त्यांचे जीवन सदैव दुःखी असायचे.

लोकशाहीने आपल्याला हे विचारस्वातंत्र्य ठेवले आहे. म्हणूनच आपण चांगले जगण्याची उमेद धरू शकतो. लोकशाहीत, आपले आपण रक्षण करणारा राजा आहोत याचा अर्थ आपले विचारस्वातंत्र्य आपण टिकवून ठेवले आहे, असा होतो. विचारी नागरीक हाच चांगला नागरीक असतो. आपण चांगला नागरीक बनण्याचीच ईर्षा ठेवली पाहिजे !

❖